03 MAR 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डी. टी. शिर्के : योजनेचे उद्घाटन

# मृत्युंजय दूत योजनेला लोकसहभागाची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

उचगाव : रस्ते अपघातातील कुटुंबियांना 'बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजने'ची माहिती देणे व रस्ते अपघातातील प्रत्येक अपघातग्रस्ताला व जखमींना तातडीने उपचार मिळावेत यासाठी हायवे मृत्युंजय दूत योजना कार्यरत असून या योजनेला लोकसहभागाची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



हायवे मृत्युंजय दूत योजनेच्या शुभारंभप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पोलीस निरीक्षक जगन्नाथ जानकर, योगेश येळापुरे, डॉ. संदीप हजारे, डॉ. नायकवडी, अभय गायभये, मानसी पंडित आदी.

उजळाईवाडीत हायवे मृत्युंजय दूत योजनेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जोतिष तज्ज्ञ मानसी पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती. हायवे मृत्युंजय दूतांना महामार्ग सुरक्षा पथकाकडून ओळखपत्रही देण्यात येणार असून चांगले काम करणाऱ्या देवदूतांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात येईल. नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन उज़ळाईवाडी महामार्ग पोलिसांकडून करण्यात आले.

यावेळी पोलीस निरीक्षक योगेश येळापुरे, पोलीस निरीक्षक जगन्नाथ जाणकर, पोलीस उपनिरीक्षक सुरेश नलवडे, पोलीस उपनिरीक्षक सुरेश शिरगुप्पी, राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय गायभये, डॉ. अनिल नायकवडी, उपस्थित होते.

तरूण भारत

# विद्यापीठात परीक्षांच्या कामाला वेग

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील परीक्षा येत्या २२ मार्चपासून सुरू होणार आहेत. त्यामुळे परीक्षा विभाग कामाला लागला असून अर्ज भरून घेण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. तसेच पाठीमागील निकालातील त्रूटी दूर करून निकाल जाहीर करण्याचे काम सुरू असून परीक्षेच्या दृष्टीने बैठकांची संख्या वाढत आहे. ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठी टेंडरसाठी मान्यता घेणे, टेंडर देणे यासह अन्य कामांना वेग आला आहे. अधिविभागात प्रात्यक्षिकांच्या परीक्षा घेण्याची तयारी सुरू आहे.

0 3 MAR 2021
Times of India

# SUK to hold first semester exams from March 22

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The first semester graduate and postgraduate examinations of the Shivaji University, Kolhapur (SUK) are set to begin from March 22 in both online and offline modes.

The exams will be objective in nature and the students will get one hour to solve 25 questions of two marks each. Megha Gulavani, the head of university's examination preparations panel, said, "Usually the university requires around one-and-a-half month to



conduct the semester exams. However, we have planned the exams for 30 days this time due to Covid and mainly to avoid any overlapping with the Std XII exams that are going to start from April 23. We have recommended to the colleges and departments of the university to complete the practical exams before March 21. Additional proctors will be appointed to ensure both online and offline exams are conducted in a transparent manner."

The exams will be held for a total of 621 subjects and around 2 lakh students will take the test across Kolhapur, Sangli and Satara districts. The university has already squeezed the syllabus for graduate and PG courses and the questions will be based on the portion fixed by the university.